# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

**Date: 08 April 2024**

**Time 01.00 to 01.05 PM**

**Language Marathi**

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक ०८ एप्रिल २०२४ दुपारी १.०० वा.**

****

भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी आज संध्याकाळी चंद्रपूर आणि गडचिरोली लोकसभा मतदारसंघात प्रचार सभा घेणार आहेत. राज्याचे वनमंत्री सुधीर मुनगंटीवार हे चंद्रपूर लोकसभा मतदारसंघातून तर विद्यमान खासदार अशोक नेटे हे गडचिरोली लोकसभा मतदारसंघातून भाजपचे उमेदवार आहेत. पंतप्रधान यानंतर १० तारखेला नागपूर इथं रामटेक लोकसभा मतदारसंघातल्या उमेदवारांसाठी प्रचारसभा घेणार आहेत. लोकसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यात नागपूर, रामटेक, चंद्रपूर, गडचिरोली-चिमूर आणि भंडारा-गोंदिया या पूर्व विदर्भातील पाच मतदारसंघात १९ एप्रिलला मतदान होणार आहे.

****

दिल्लीतल्या कथित मद्यधोरण घोटाळ्याप्रकरणी तुरुंगात असलेल्या बीआरएस नेत्या के. कविता यांचा अंतरिम जामीन अर्ज दिल्लीतल्या राऊस न्यू अव्हेन्यू न्यायालयानं फेटाळला. के. कविता यांना २६ मार्च रोजी ९ एप्रिलपर्यंत न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली होती. १५ मार्च रोजी ईडीनं त्यांना हैदराबाद इथल्या राहत्या घरातून अटक केली. त्या सध्या तिहार तुरुंगात न्यायालयीन कोठडीत आहेत.

****

राष्ट्रीय शिक्षण संशोधन आणि प्रशिक्षण परिषद -एनसीईआरटीनं त्यांच्या शैक्षणिक साहित्यावरील स्वामित्व हक्कांबाबत निर्देश जारी केले आहेत. जर एखाद्या व्यक्ती किंवा संस्थेनं परवानगीशिवाय एनसीईआरटीची अधिकृत पाठ्यपुस्तकं व्यावसायिक वापरांसाठी प्रकाशित केल्यास त्यांच्यावर कायदेशीर कारवाई केली जाईल, असा इशारा परिषदेनं दिला आहे. नक्कल करण्यात आलेल्या पाठ्यपुस्तकातला मजकूर चुकीचा असू शकतो, त्यामुळं अशी पाठ्यपुस्तकं किंवा कार्यपुस्तकं लोकांनी वापरू नये, असं आवाहनही एनसीईआरटीच्या वतीनं करण्यात आलं आहे. नक्कल केलेली

पाठ्यपुस्तकं किंवा कार्यपुस्तकं आढळल्यास एनसीईआरटीला कळवावं असंही आवाहनही करण्यात आलं आहे.

****

छत्तीसगडमध्ये सुकमा जिल्ह्यात आज सुरक्षा दलानं दोन ठिकाणांहून मोठ्या प्रमाणात स्फोटकं जप्त केली. ही स्फोटकं नक्षलवाद्यांनी लपवून ठेवली असल्याचं सुरक्षा दलाच्या अधिकाऱ्यांनी सांगितलं.

****

दरम्यान, गडचिरोलीत दोन महिला नक्षलवाद्यांसह एका नक्षल समर्थकाला गडचिरोली पोलिसांनी काल अटक केली. विविध गंभीर गुन्ह्यांमध्ये सहभागी असलेल्या या तिघांवर महाराष्ट्र शासनानं साडेपाच लाख रुपयांचं बक्षीस जाहीर केलं होतं. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर हिंसक कारवाया रोखण्यासाठी पोलिसांच्या वतीनं राबवण्यात येणाऱ्या नक्षलविरोधी अभियानांतर्गत ही कारवाई करण्यात आल्याचं याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

****

लोकसभेच्या दुसऱ्या टप्प्यातल्या निवडणुकीसाठी अर्ज मागे घेण्याची आज शेवटची तारीख आहे. परभणी लोकसभा मतदार संघासाठी नामनिर्देशन पत्र मागे घेण्यास सुरूवात झाली आहे. निवडणूक निर्णय अधिकारी तथा जिल्हाधिकारी रघुनाथ गावडे यांच्या अध्यक्षतेखाली आणि मुख्य निवडणूक निरीक्षक कृष्ण कुमार निराला यांच्या उपस्थितीत बाळासाहेब उगले यांनी आपला अपक्ष उमेदवारी अर्ज मागे घेतला आहे.

****

दरम्यान, अकोला लोकसभा मतदार संघातही आज उमेदवारी अर्ज मागे घेण्याची मुदत संपत असून, दुपारी निवडणूक चिन्हांचेही वितरण होणार आहे. वंचित बहुजन आघाडी, काँग्रेस आणि भाजप या तिनही प्रमुख पक्षांच्या उमेदवारांचे तसंच भाजपचे बंडखोर उमेदवार माजी आमदार नारायणराव गव्हाणकर यांच्यासह १७ जणांचे अर्ज वैध ठरले आहेत.

****

महाविकास आघाडीतील घटक पक्षांमध्येच समन्वय नसल्याची टीका वंचित बहुजन आघाडीचे नेते प्रकाश आंबेडकर यांनी केली आहे. ते आज अकोला इथं पत्रकार परिषदेत बोलत होते. राज्यातल्या उर्वरित जागांबाबत दोन दिवसात निर्णय जाहीर करणार असल्याचंही आंबेडकर यांनी स्पष्ट केलं.

****

लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर 'लोकनिर्णय महाराष्ट्राचा' हा कार्यक्रम, आकाशवाणीनं सुरू केला आहे. कार्यक्रमाच्या आजच्या भागात आपण परभणी लोकसभा मतदार संघाचा आढावा ऐकणार आहोत. संध्याकाळी सव्वा सात वाजता हा कार्यक्रम ऐकता येईल.

****

लोकसभा निवडणुकीमध्ये मतदानाची टक्केवारी वाढावी, याकरता अमरावतीत निवडणूक मतदार जागृती स्वीप उपक्रमांतर्गत विविध कार्यक्रम राबविण्यात येत आहे. विभागिय क्रीडा संकुलात आज सकाळी पाच हजार विद्यार्थी, नागरीक आणि युवा मतदारांनी मानवी साखळी तयार करत मतदानाबाबत जनजागृती केली. मानवी साखळीच्या माध्यमातून मतदान प्रक्रियेत सहभाग नोंदवून मतदारांना मतदानानाचा हक्क बजावण्यासाठी प्रोत्साहित करण्यात आलं. यावेळी जिल्हाधिकारी सौरभ कटीयार, पोलिस आयुक्त नविनचंद्र रेड्डी, महानगरपालिका आयुक्त देविदास पवार, पद्मश्री शंकर बाबा पापळकर आदींची उपस्थिती होती.

****

रायगड जिल्ह्यात मुंबई-गोवा महामार्गावर माणगाव जवळ काल रिक्षा आणि शिवशाही बसचा अपघात झाला. यांत रिक्षातल्या तीन प्रवाशांचा जागीच मृत्यू झाला. ही बस दापोलीला जात असताना माणगावला मानस हॉटेल समोर आली. त्यावेळी हा भीषण अपघात घडला.

****

मराठवाड्यासह राज्याच्या काही भागात पुढच्या २४ तासांत मेघगर्जनेसह पावसाची शक्यता, हवामान विभागानं वर्तवली आहे.

****